कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ३९८ /२०२६ दि.१२/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कोळशेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई अंतर्गत लोढा–पलावा जंक्शन येथे काटई ते देसाई खाडी पावेतो कल्याण कडून शिळफाटयाकडे जाणाऱ्या वाहीवीवर नविन उडड्राण पुल निर्माण करण्याचे काम चालू आहे. दि. १५/०९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ रोजी रात्री ११:३० ते सकाळी ०५:०० वाजेचे दरम्यान कल्याण कडून शिळफाटयाकडे जाणाऱ्या वाहीनीवर लोढा हेवन कडे जाणाऱ्या रस्त्याचे प्रवेशद्वार व नवरत्न स्वीट कॉर्नर समोर लोढा पलावा जंक्शन येथे टप्या– टप्यात ०४ (चार) सिमेंट गर्डर मोठे क्रेनचे साहाय्याने आवश्यकतेनुसार ठेवणार आहेत. सदरवेळी कल्याण शिळ रोड, कल्याण कडून शिळफाटया्कडे जाणारे वाहने लोढा पलावा जंक्शन नवरत्न स्वीट कॉर्नर समोरून शिळफाटा कड्न येणाऱ्या वाहीनीवरून पुढे विरूध्द दिशेने जावून पुढे लोढा पलावा कासारिओ गॅपमधून डावीकडे वळण घेवून इच्छित स्थळी जातील. दरम्यान लोढा पलावा एक्सपिरीया मॉल ते कासा रिओ कट एकाच वाहीनीवर एकेरी वाहतूक सुरू ठेवावी लागणार आहे. सदर कालावधीत परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) कल्याण कडून मुंब्रा कल्याणफाटया कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना **लोढा पलावा जंक्शन नवरत्न स्विट कॉर्नर समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने कल्याण फाटा कडून येणाऱ्या वाहीनीवर पुढे विरूध्द दिशेने लोढा पलाव जंक्शन, कासा रिया कट पर्यंत जावुन त्यानंतर डावीकडे वळण घेवुन इच्छित स्थळी जाईल.
प्रवेश बंद –	२) कल्याण कडून मुंब्रा कल्याण फाटया कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **काटई चौक (बदलापुर चौक)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची जड – अवजड वाहने काटई चौक (बदलापुर चौक) – खोणी नाका – तळोजा एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना खालील नमुद तारखांना अंमलात राहील.

१) दि.१५/०९/२०२६ रोजी रात्रौ ११:३० वा ते दि.१६/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
२) दि.१६/०९/२०२६ रोजी रात्रौ ११:३० वा ते दि.१७/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
३) दि.१७/०९/२०२६ रोजी रात्रौ ११:३० वा ते दि.१८/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
४) दि.१८/०९/२०२६ रोजी रात्रौ ११:३० वा ते दि.१९/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
५) दि.१९/०९/२०२६ रोजी रात्रौ ११:३० वा ते दि.२०/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
६) दि.२०/०९/२०२६ रोजी रात्रो ११:३० वा ते दि.२१/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत
६) दि.२१/०९/२०२६ रोजी रात्रो ११:३० वा ते दि.२२/०९/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजे पर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या सर्वथीत अधिका–याकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.